MHOS100016682025

## नि.नं. ५ वरील आदेश.

अर्जदार/वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी अथवा त्यांचे मार्फत इतर कोणीही दावा मिळकतीवरील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणे बाबत प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णनः–**

२. मौजे वाशी, ता. वाशी, जि. धाराशिव येथील जमिन सर्व्हे नं. ७६०/क पैकी क्षेत्र ०० हे. ८० आर, आकार ०० रु. ९९ पैसे ज्याच्या चतुःसिमा – पुर्वेस, पश्चिमेस व उत्तरे – प्रकाश शामराव कवडे यांची जमीन व दक्षिणेस सुभाष कवडे यांची जमीन.

(सदर मिळकतीस यापुढे संक्षेपाकरीता ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात येत आहे.)

**अर्जदारांचे कथन थोडक्यात खालील प्रमाणेः–**

३. वादी/अर्जदाराने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द निरंतर मनाई

हुकूम मिळणेकरीता दाखल केला आहे. दावा मिळकत ही वादीची स्वकष्टार्जीत मिळकत आहे. वादीने दावा मिळकत ही नोंदणीकृत खरेदीखत क्र. ११२०/१९९८ दिनांक ०८/०९/१९९८ अन्वये प्रकाश शामराव कवडे यांचेकडून खरेदी घेतली असुन तेंव्हापासुन वादी ही दावा मिळकतीची स्वतंत्र मालक व कब्जेवहिवाटदार झाली आहे. दावा मिळकतीशी प्रतिवादींचा कसलाही हक्क संबंध नाही. असे असताना प्रतिवादी हे जाणुनबुजून वादीच्या वयोवृध्दपणाचा व असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन बेकायदेशिररित्या जमीन हडपण्याच्या हेतुने दावा मिळकतीवरील वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत.

४. अर्जदार/वादीचे पुढे असे म्हणने आहे की, दिनांक ०९/११/२०२५ रोजी प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत घेऊन हरकतींचा क्रम चालु ठेवण्याचा मनोदय व्यक्त केला. त्यामुळे वादीस प्रस्तुतचा दावा व मनाई अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. सदर प्रकरणाचा अंतिम निकाल होईपर्यंत बराच कालावधी लागणार आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. दाव्याचा समतोल व हा वादीच्या बाजुने असुन प्रथमदर्शनी केस वादीच्या हक्कात आहे. त्यामुळे प्रतिवादींनी अथवा त्यांच्या मार्फत इतर कोणीही वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा आदेश दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत मंजुर होणे आवश्यक आहे. करीता सदर अर्ज सादर केला आहे.

**<u>गैरअर्जदाराचे कथन थोडक्यात खालील प्रमाणेः–</u>**

**५.** मुळ दाव्याचे समन्स व प्रस्तुत अर्जाची नोटीस मिळाल्यानंतर प्रतिवादी हे प्रकरणात हजर झाले. परंतु, त्यांनी मुदतीत त्यांचे लेखी कैफियत व म्हणने सादर केले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणने विना गुणदोषांवर चालविण्यात आला.

**६.** अर्ज व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी तर्फे विधीज्ञ श्री. एस. बी. तावरे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी प्रकरण अर्जदारांच्या बाजुने आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | अर्ज नामंजूर झाल्यास अर्जदारांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय ? | होकारार्थी. |
| ३. | तुलनात्मक दृष्ट्या प्रकरण अर्जदारांच्या बाजुने आहे काय ? | होकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीताः–</u>**

**७.** विचाराधीन मुद्यांकडे जाण्याआगोदर या ठिकाणी नमुद करणे

आवश्यक आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम गैरअर्जदाराविरुध्द मिळावा या कामी दाखल करण्यात आलेला आहे.

८. सदर अर्जाचे अनुषंगाने अर्जदाराची प्राथमीक जबाबदारी अशी आहे की, सकृत दर्शनी प्रकरण त्याचे बाजुने आहे काय, त्याच प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम न मिळाल्यास त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय व तुलनात्मक दृष्ट्या प्रकरण त्याच्या बाजुने आहे काय या बाबी कायद्याने शाबीत कराव्यात.

९. सदर प्रकरणामध्ये वादीने नि.क्र. ४ वरील कागदपत्र यादीसोबत दावा मिळकतीच्या ८–अ उतारा नि.क्र.८, ७/१२ पत्रकाची प्रमाणित प्रत नि.क्र. ९, फेरफार क्र. ६८७२ ची प्रमाणित प्रत नि.क्र. १० तसेच नोंदणीकृत खरेदीखत क्र. ११२०/१९९८ ची छायांकीत प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. याउलट प्रतिवादींनी कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही.

१०. सदर प्रकरणामध्ये वादीचे असे म्हणने आहे की, गैरअर्जदार/प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कसलाही हक्क संबंध नाही. वादीने दावा मिळकत ही नोंदणीकृत खरेदीखत क्र. ११२०/१९९८ दिनांक ०८/०९/१९९८ अन्वये प्रकाश शामराव कवडे यांचेकडून खरेदी घेतली असुन तेंव्हापासुन वादी ही दावा मिळकतीची स्वतंत्र मालक व कब्जेवहिवाटदार झाली आहे. असे असताना प्रतिवादी हे जाणुनबुजून वादीच्या वयोवृध्दपणाचा व असहाय्यतेचा गैरफायदा

घेऊन बेकायदेशिररित्या जमीन हडपण्याच्या हेतुने दावा मिळकतीवरील वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. तसेच दिनांक ०९/११/२०२५ रोजी प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत घेऊन हरकतींचा क्रम चालु ठेवण्याचा मनोदय व्यक्त केला.

**११.** अभिलेखावरील दाखल कागदपत्रांवरुन असे दिसुन येते की, वादी ही दावा मिळकतीची मालक व कब्जेवहिवाटदार आहे. त्यामुळे सदर प्रकरणाचा न्यायनिर्णय होईपर्यंत प्रतिवादींनी वादीचे शांततामय कब्जेउपभोगास हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देणे योग्य व न्यायोचीत ठरणार आहे. त्यामुळे न्यायालयासमक्ष आलेल्या संपुर्ण अभिलेखावरुन असे दिसुन येते की, वादीने तिचे हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे. तुलनात्मक दृष्ट्या न्यायाचा समतोल हा वादीच्याच बाजुने आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादीचेच कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. याउलट जर तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला तर वादी किंवा प्रतिवादी यांचे कोणाचेही नुकसान होणार नाही असे दिसुन येते. या सर्व बाबी पाहता सदर प्रकरणाचा अंतिम निर्णय होइपर्यंत वादीच्या हक्कामध्ये तुर्तातुर्त मनाई हुकूम देणे न्याय्य व योग्य आहे. करीता मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीताः–</u>**

**१२.** मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्षांचा विचार करीता मी या निष्कर्षास आले आहे की, नि.क्र. ५ वरील तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणुन

मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. सदर अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. सदर प्रकरणातील प्रतिवादी अथवा त्यांचे मार्फत इतर कोणीही सदर वादीच्या दावा मिळकतीवरील शांततापुर्ण कब्जेवहिवाटीमध्ये दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत हरकत अडथळा करु नये.

३. अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

MAHADEVI VISHAL PATIL
Digitally signed by MAHADEVI VISHAL PATIL
Date: 2026.07.31 15:32:10 +0530

ठिकाण– वाशी.
दिनांक – ३१/०७/२०२६.

(श्रीमती एम. व्ही. पाटील–राठोडे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, वाशी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. A.M.Wagh Stenographer (G-III) |
| Name of the Court | --- | C.J.J.D. & J.M.F.C. Washi |
| Date of order | --- | 31/07/2026 |
| Order signed by the Presiding officer on | –- | 31/07/2026 |
| Order uploaded on | – | 31/07/2026 |